


मार्गदर्शन करताना डॉ. साने

# रसायनशास्त्र विभागात ओझोन दिवस साजरा

तभा वृत्तसेवा
अमरावती, १६ ऑक्टोबर

'विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात ओझोन दिवस साजरा करण्यात आला. ओझोन लेअर प्रोटेकन : द मिशन गोज् ऑन ही संकल्पना यावर्षी ओझोन दिवसाकरिता ठेवण्यात आली होती.

प्रमुख अतिथी म्हणून डॉ. साने म्हणाले, संस्कृती व परंपरेने नटलेला आपला देश असून, साजरे होणारे सण व उत्सव पर्यावरण पूरक असले पाहिजे. आपल्या संस्कृतीने सुद्धा तेच सांगितले आहे. परंतु आज साजरे होणारे सण उत्सव यामुळे प्रदूषण वाढत आहे, त्याचा परिणाम लहान मुलं व वृद्धांच्या प्रकृतीवर होत असून, नवीन पिढीलासुद्धा त्याचा धोका निर्माण झाला आहे. पर्यावरणात झालेल्या धोक्यामुळे वातावरणाला पोषक असणाऱ्या ओझोन थरालासुद्धा हानी पोहचली आहे. सूर्याची अनियमित किरणे पृथ्वीवर पडत असल्यामुळे त्याचा परीणाम निसर्ग चक्रावर झाला आहें. पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी सर्वांची असून, विद्यार्थ्यांनी त्यासाठी पुढाकार घेऊन जनजागृती करण्याचे मत डॉ. आर. टी. साने यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषण करताना डॉ. आनंद अस्वार म्हणाले, ओझोनथर टिकवून ठेवणे ही आजची गरज आहे. सूर्याच्या अनियमित किरणापासून त्वचेच्या कर्करोगाची व त्वचा विकाराची शक्यता असते. डोळ्याचे विकार नवजात बालक आणि वयोवृद्धांना सुद्धा त्याचा जास्त त्रास होतो.

ओझोनची निर्मिती कुत्रीमरीत्या करणे शक्य नसलेतरी प्रदूषण मुक्त निर्सग टिकविणे हे त्यावर उत्तम उपाय आहे. चंगळवादाकडे दुर्लक्ष करून पर्यावरण वाचविण्याचा संकल्प सर्वांनी करावा, असे आवाहन सुद्धा त्यांनी याप्रसंगी केले.

ओझोन दिवसानिमित्त पोस्टर प्रेझेन्टेशन, समूहचर्चा, वादविवाद स्पर्धा, प्रश्न मंजुषा व तज्ज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यातून ओझोन दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात गाडगेबाबा व माँ सरस्वतीच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाली. पाहुण्यांचे स्वागत रसायनशास्त्र मंडळाचे अध्यक्ष निखिल गावंडे व डॉ. मनीषा कोडापे यांनी केले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेमध्ये विभागाच्या हिना रुपारेलीया हिने प्रथम, तर गौरव पाटील ह्याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. जागृती बारब्दे, डॉ. मनीषा कोडापे व स्वाती गाडखे ह्यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे संचालन रमी श्रीराव हीने, तर आभारप्रदर्शन निखिल गावंडे ह्यांनी केले. पाहुण्यांचा परिचय तथा आयोजनामागील भूमिका डॉ. मनीषा कोडापे ह्यांनी विषद केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विभागातील विद्यार्थी निखील गावंडे, चेतन चिंतावर, सागर चौकीदार, प्रणाली घोटोळे, निर्मल जंजाळ, नितीन आसोले, सोनाली मांजरे, रमी श्रीराव, वरिर लोन, राधिका हरकुट, मेहवा काझी, श्रद्धा भडांगे आदीनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विभागातील सर्व विद्यार्थी तथा शिक्षक उपस्थित होते.